| Question Booklet Series<br>प्रश्नपुस्तिका मालिका | Question Paper Code<br>प्रश्नपत्रिका कोड | Question Booklet No.<br>प्रश्नपुस्तिका क्र. |
|---|---|---|
| **B** | **18** | |

Roll No. : / रोल नं. : ______________________

Name of the Candidate : / उमेदवाराचे नाव : ______________________

| *Test Duration : 90 Minutes*<br>*चाचणीचा कालावधी : 90 मिनिटे* | *Total No. of Questions : 100*<br>*प्रश्नांची एकूण संख्या : 100* | *Total Marks : 100*<br>*एकूण गुण : 100* |
|---|---|---|

## INSTRUCTIONS TO THE CANDIDATES : / उमेदवारासाठी सूचना :

THE CANDIDATES MUST READ THESE INSTRUCTIONS CAREFULLY BEFORE ATTEMPTING THE QUESTIONS IN THE QUESTION BOOKLET.

**प्रश्नपुस्तिकेतील प्रश्न सोडवण्यापूर्वी उमेदवाराने या सूचना काळजीपूर्वक वाचल्या पाहिजेत.**

1. Mark carefully your Roll Number, Question Paper Code, Question Booklet Number and Question Booklet Series on the OMR Answer Sheet and signature at the appropriate place. Write your Roll Number and **Name on the Question Booklet**. In the absence of Roll Number, Question Booklet Number and Question Booklet Series on the OMR Answer Sheet, it may NOT be evaluated and it may be cancelled.

   ओएमआर वर तुमचा रोल नंबर, प्रश्नपत्रिका कोड, प्रश्नपुस्तिका क्रमांक आणि प्रश्नपुस्तिका मालिका काळजीपूर्वक लिहा आणि योग्य ठिकाणी स्वाक्षरी करा. प्रश्नपुस्तिकेत तुमचा रोल नंबर आणि नाव लिहा. ओएमआर उत्तरपत्रिकेवर रोल नंबर, प्रश्नपुस्तिका क्रमांक आणि प्रश्नपुस्तिका मालिका नसल्यास त्याचे मुल्यांकन होणार नाही आणि ते रद्द ठरवले जाऊ शकते.

2. The entire Test is of Objective Type Questions comprising of **100** questions. All questions are mandatory.

   संपूर्ण चाचणी वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रश्नांची असून, त्यात 100 प्रश्न आहेत. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

   **Each question carries One Mark. There is No Negative Marking for any wrong answer. Questions are in Marathi language only.**

   **प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. यात कोणत्याही चुकीच्या उत्तरासाठी निगेटिव्ह मार्किंग नाही. प्रश्न फक्त मराठी भाषेत आहेत.**

3. The candidate must check that the Question Booklet contains 100 multiple choice questions in **12** pages. If any discrepancy is found, report to the invigilator immediately.

   उमेदवाराने त्या प्रश्नपुस्तिकेत 12 पानांमध्ये 100 बहुपर्यायी प्रश्न असल्याचे तपासून घेतले पाहिजेत. कोणतीही विसंगती आढळल्यास, पर्यवेक्षकाला त्वरित कळवा.

4. Chosen options are to be indicated only on the OMR Answer Sheet, as per instructions given on the OMR Answer Sheet, taken care to enter the answer in prescribed manner in the space provided in the OMR Answer Sheet for the concerned question number (as given in the Question Booklet).

   संबंधित प्रश्न क्रमांकासाठी ओएमआर उत्तरपत्रिकेत दिलेल्या जागेत विहित पध्दतीने उत्तर लिहिण्याची काळजी घेत, ओएमआर उत्तरपत्रिकेवर दिलेल्या सूचनांच्या अनुसार निवडलेले पर्याय फक्त ओएमआर उत्तरपत्रिकेवर सूचित करायचे असतील (दिलेल्या प्रश्नपुस्तिके नुसार).

5. The candidate must use a **BLUE/BLACK** ball point pen ONLY to make entries on the OMR Answer Sheet.

   उमेदवाराने ओएमआर उत्तरपत्रिकेवर प्रविष्टी करताना फक्त **निळे/काळे** बॉल पॉइंट पेनच वापरले पाहिजे.

6. Rough work may be done on the space provided in this Question Booklet, but not on the OMR Answer Sheet.

   कच्चे काम ओएमआर उत्तरपत्रिकेवर न करता प्रश्नपुस्तिकेत दिलेल्या जागेतच केले पाहिजे.

7. At the end of the Test, the candidate must submit the OMR Answer Sheet and Question Booklet to the invigilator on duty.

   चाचणीच्या अखेरीस, उमेदवाराने ओएमआर उत्तरपत्रिका आणि प्रश्नपुस्तिका ड्युटीवर असलेल्या पर्यवेक्षकाला सोपवली पाहिजे.

**PLEASE REFER THE BACKSIDE OF THE QUESTION BOOKLET FOR MORE INSTRUCTIONS.**

**अधिक सूचनांसाठी, कृपया प्रश्न पुस्तिकेच्या मागील बाजूचा संदर्भ घ्या.**

1. लोकमान्य टिळक यांनी कोणते वृत्तपत्र सुरू केले ?

(A) केसरी (B) यंग इंडिया

(C) युगांतर (D) सुधारक

2. 'आगंतुक' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(A) अभिवादन (B) अनपेक्षित

(C) आमंत्रित (D) सहेतुक

3. 3 मार्च 2004 हा दिवस जर सोमवार असेल तर 3 मार्च 2011 या दिवशी कोणता वार असेल ?

(A) सोमवार (B) बुधवार

(C) मंगळवार (D) गुरुवार

4. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता ?

(A) आमदार (B) खासदार

(C) मंत्री (D) जिल्हाधिकारी

5. 654897 या संख्येतील 9 ची स्थानिक किंमत किती ?

(A) 9000 (B) 97

(C) 9 (D) 90

6. पुल्लिंग ओळखा.

(A) गवळी (B) कोळीन

(C) कासारीन (D) वाघीन

7. $45 \times 0 \times 12 = ?$

(A) 12 (B) 45

(C) 0 (D) 09

8. $5 \times 20 \times 0 + 7 = ?$

(A) 107 (B) 100

(C) 0 (D) 7

9. वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही कोण होते ?

(A) गोपाळकृष्ण गोखले

(B) लोकमान्य टिळक

(C) आचार्य विनोबा भावे

(D) वि.दा. सावरकर

10. खालीलपैकी विशेषनाम कोणते ते ओळखा.

(A) पर्वत (B) नदी

(C) हिमालय (D) शहर

11. नरेश पश्चिमेला चालतो आहे. तो उजवीकडे वळतो, परत उजवीकडे वळतो, नंतर पुन्हा उजवीकडे वळून मग डावीकडे वळून चालायला लागला तर तो नेमक्या कोणत्या दिशेला जात आहे ?

(A) उत्तर (B) पूर्व

(C) पश्चिम (D) दक्षिण

12. ग्रामपंचायतीचा प्रशासकीय अधिकारी कोण असतो ?

(A) ग्रामसेवक

(B) पटवारी

(C) पोलीस पाटील

(D) गटविकास अधिकारी

13. "पाणी" या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.

(A) जल (B) पाऊस

(C) हात (D) यापैकी नाही

14. $25 \times 24 = 600$ तर $2500 \times 2400 = ?$

(A) 6000 (B) 60000

(C) 600000 (D) 6000000

15. $\frac{5}{6} \times \frac{3}{2} \times \frac{4}{5} = ?$

(A) 1 (B) 3

(C) 4 (D) 6

16. $7^3 = ?$

(A) 335 (B) 49

(C) 343 (D) 21

17. X ही एक विषम संख्या आहे, खालीलपैकी सम संख्या कोणती ?

(A) $X+6$ (B) $2X+7$

(C) $2X-4$ (D) $X-4$

18. 'मीठभाकरी' या शब्दाचे लिंग कोणते ?

(A) पुल्लिंग

(B) स्त्रीलिंग

(C) नपुंसकलिंग

(D) अकारान्त पुल्लिंग

19. 'देव' या नामाचे अनेकवचन कोणते ?

(A) देवा (B) देवाला

(C) देव (D) यापैकी नाही

20. खालील पर्यायांमध्ये काही नावे दिली आहेत. त्यातील विसंगत नाव ओळखा ?

(A) इंद्रकुमार गुजराल

(B) लालबहादूर शास्त्री

(C) एच.डी. देवेगौडा

(D) डॉ. राजेंद्र प्रसाद

21. 'सोने' या शब्दाचे वचन बदलून येणारे रूप शोधा.

(A) सोन्या (B) सोनं

(C) सोने (D) सोनी

22. $7 \times 8 + 4 \times 9 + 5 \times 6 = ?$

(A) 112 (B) 116

(C) 118 (D) 122

23. खालीलपैकी कोणता देश सार्कचा सदस्य नाही ?

(A) नेपाळ (B) भुटान

(C) जपान (D) अफगाणिस्तान

24. महाराष्ट्र राज्याची सर्वात लांब सीमा ________ या राज्याबरोबर आहे.

(A) कर्नाटक (B) आंध्र प्रदेश

(C) मध्य प्रदेश (D) छत्तीसगढ

25. खालीलपैकी सामान्यनाम ओळखा.

(A) पर्वत (B) हिमालय

(C) सह्याद्री (D) सातपुडा

26. तु फार चतुर आहेस ही वाक्यरचना कोणत्या प्रकारची आहे ?

(A) आज्ञार्थी (B) उद्गारार्थी

(C) विधानार्थी (D) प्रश्नार्थी

27. नागपूर या प्रशासकीय विभागात किती जिल्हे आहेत ?

(A) 8 (B) 7

(C) 6 (D) 5

28. "सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी" यातील अलंकार ओळखा.

(A) उत्प्रेक्षा (B) उपमा

(C) रूपक (D) यमक

29. 13, 17, 19, 23, 29, ?

(A) 31 (B) 33

(C) 35 (D) 37

30. $\frac{1}{2}+\frac{1}{3}+\frac{1}{4}+\frac{1}{5}=?$

(A) $\frac{1}{14}$ (B) $\frac{4}{14}$

(C) $\frac{77}{60}$ (D) $\frac{4}{120}$

31. चौदा मजुरांची मजुरी 7056 रुपये असल्यास एका मजुराची मजुरी किती ?

(A) 5040 (B) 504

(C) 72 (D) 720

32. धरणी, अवनी, वसुंधरा ही खालीलपैकी कोणत्या शब्दाचे समानार्थी शब्द आहेत ?

(A) मुलगी (B) पत्नी

(C) पृथ्वी (D) नदी

33. विसंगत घटक ओळखा.

(A) तांबे (B) ॲल्युमिनियम

(C) पारा (D) लोखंड

34. विसंगत शब्द ओळखा.

गुरु, चंद्र, मंगळ, बुध

(A) गुरु (B) चंद्र

(C) मंगळ (D) बुध

35. 91 + 92 + 93 + ..... + 100 = ?

(A) 945 (B) 935

(C) 955 (D) 985

36. $0.25 \times 2.5 \times 1.2 = ?$

(A) 0.25 (B) 0.50

(C) 0.75 (D) 0.100

B

37. संविधान सभेचे अध्यक्ष कोण होते ?

(A) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(B) महात्मा गांधी

(C) जवाहरलाल नेहरू

(D) डॉ. राजेंद्र प्रसाद

38. 'अ' आणि 'ब' दोन्ही 'क' ची अपत्ये आहेत 'क' हे 'अ' चे वडील आहेत परंतु 'ब' हा 'क' चा मुलगा नाही तर 'ब' आणि 'क' चे नाते काय ?

(A) मुलगी व वडील

(B) पती व पत्नी

(C) आजोबा व नात

(D) मुलगा व वडील

39. वसंत वैभवपेक्षा लहान पण सुनंदा पेक्षा मोठा आहे. वासंती सुनंदापेक्षा मोठी पण वसंतपेक्षा लहान आहे तर सर्वात लहान कोण ?

(A) सुनंदा (B) वसंत

(C) वासंती (D) वैभव

40. शिपाई शूर होता या वाक्यात शूर काय आहे ?

(A) नाम (B) सर्वनाम

(C) विशेषण (D) क्रियापद

41. 'राजा' या शब्दाचे सामान्यरूप ओळखा.

(A) राजा (B) राजे

(C) राज्य (D) राज्जा

42. 'कवी' या शब्दाचे विरुद्धलिंगी शब्द काय ?

(A) कवी (B) कवीण

(C) कवित्री (D) कवयित्री

43. 'तिला मी आई म्हणतो' या वाक्यातील उद्देश्य विभाग ओळखा.

(A) तिला

(B) आई

(C) मी

(D) तिला आई म्हणतो

44. झिरो माईल स्थान कोणत्या शहरात आहे ?

(A) औरंगाबाद (B) मुंबई

(C) नागपूर (D) नाशिक

45. त्वचा : स्पर्श : : नाक : ?

(A) सुवास (B) कान

(C) गंध (D) नासिका

46. वाक्य प्रकार ओळखा – जेव्हा अण्णा निवृत्त झाले त्यांनी उर्दुचा अभ्यास पूर्ण केला.

(A) केवलवाक्य

(B) संयुक्त वाक्य

(C) मिश्र वाक्य

(D) केवल–मिश्र वाक्य

47. $(-15) \times (-15) = ?$

(A) 125 (B) 225

(C) .225 (D) यापैकी नाही

48. AZ, CX, EV, GT, ?

(A) HS (B) IR

(C) JQ (D) KP

49. 1857 च्या उठावाची सुरुवात कोठे झाली ?

(A) कानपूर (B) मिरत

(C) झांशी (D) अराह

50. खालील जोडशब्दाचा पोटशब्द ओळखा.

'महर्षी'

(A) महा + ऋषी

(B) महान + ऋषी

(C) महातपस्वी + ऋषी

(D) मह + र्षी

51. माधवीने सफरचंद खाल्ले – या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(A) कर्तरी (B) कर्मणी

(C) भावे (D) यापैकी नाही

52. 'व्यर्थ' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या समासाचे उदाहरण आहे ?

(A) तत्पुरुष (B) द्वंद्व

(C) बहुव्रीही (D) अव्ययीभाव

53. $803 \times 15 = ?$

(A) 10245 (B) 10545

(C) 12045 (D) 12405

54. साडे नऊ हजार + पावणे एकोणवीस हजार + सव्वा एकोणसाठ हजार = ?

(A) 87750 (B) 87500

(C) 87000 (D) 87250

55. पाण्याचे रेणूसूत्र काय आहे ?

(A) $H_2O$ (B) HO

(C) $HO_2$ (D) Water

56. एका स्त्रीची ओळख करून देताना स्वाती म्हणाली, "ही माझ्या नणंदेच्या भावाच्या मुलीची आई आहे," तर स्वातीचे त्या स्त्रीशी काय नाते आहे ?

(A) जाऊ (B) स्वत:

(C) बहीण (D) वहिनी

57. 18 आणि 24 यांचा लसावि व मसावि किती ?

(A) 72, 6 (B) 74, 8

(C) 78, 10 (D) 84, 6

58. 7, 11, 13, 17, 19, ?

(A) 21, 23 (B) 23, 29

(C) 29, 30 (D) 20, 22

59. कोणत्या द्रव्यामुळे झाडाची पाने हिरवी दिसतात ?

(A) क्लोरोफील (B) नायट्रोजन

(C) कार्बन (D) कॅल्शियम

60. गटात न बसणारा ओळखा.

(A) बलूचिस्थान (B) उजबेकीस्थान

(C) तजाकिस्थान (D) तुर्कमेनिस्थान

61. एका पेटीत दोन डझन आंबे आहेत, अशा 24 पेट्यांतील एकूण आंबे किती होतील ?

(A) 288 (B) 600

(C) 329 (D) 576

62. अनिल, संजय, सुनिल, दिपक, महेश, प्रशांत, सुरेश ही सात मुले एका रांगेत बसली आहेत. सुनिल, दिपक व अनिलच्या मध्ये, महेश हा प्रशांत व सुरेशच्या मध्ये आणि संजय हा दिपक व प्रशांत यांच्या मध्ये आहे. अनिल व सुरेश दोन्ही टोकाला आहेत, तर दिपक कोणाच्या मध्ये आहे ?

(A) सुनिल व संजय

(B) अनिल व संजय

(C) संजय व महेश

(D) सुनिल व प्रशांत

63. दिपक खाली डोके वर पाय करून उभा आहे अशा अवस्थेत त्याचे तोंड उत्तर दिशेस असेल तर त्याचा उजवा हात कोणत्या दिशेस आहे ?

(A) पूर्व (B) दक्षिण

(C) वायव्य (D) पश्चिम

64. खालीलपैकी अपूर्ण वर्तमान काळातील क्रियापद कोणते ?

(A) बागडते (B) बागडत असते

(C) बागडत आहोत (D) बागडली आहेत

65. $9800/84 = ?$

(A) 11.26 (B) 11.19

(C) 12.76 (D) 116.6

66. कोणत्या रेखावृत्तास आंतरराष्ट्रीय वार रेषा म्हणतात ?

(A) 80 अंश पूर्व रेखावृत्त

(B) 90 अंश पश्चिम रेखावृत्त

(C) 180 अंश रेखावृत्त

(D) 0 अंश रेखावृत्त

67. जर निळ्याला हिरवा म्हटले, हिरव्याला पांढरा म्हटले व पांढऱ्याला पिवळा म्हटले तर दुधाचा रंग कोणता ?

(A) निळा (B) पांढरा

(C) पिवळा (D) हिरवा

68. 11 : 25 : : ? : 35

(A) 16 (B) 22

(C) 15 (D) 8

69. माझ्या घड्याळात आता 09.00 वाजले आहेत. तास काटा पश्चिम दिशा दाखवित आहे तर मिनिटकाट्याची विरुद्ध दिशा कोणती ?

(A) वायव्य (B) उत्तर

(C) दक्षिण (D) आग्नेय

70. 10 मुलांना 20 किलोग्रॅम साखर 30 दिवस पुरते, तर एका मुलाला 2 किलोग्रॅम साखर किती दिवस पुरेल ?

(A) 5 (B) 10

(C) 60 (D) 30

71. शनिवार वाडा कोणाच्या कारकिर्दीत बांधला गेला आहे ?

(A) बाजीराव पेशवे (B) नानासाहेब पेशवे

(C) शिवाजी महाराज (D) संभाजी महाराज

72. एके सकाळी सूर्योदय झाल्याबरोबर शरद ध्वज स्तंभाकडे तोंड करून उभा होता. तो सरळ थोडे अंतर चालला व थांबला असता त्याला ध्वज स्तंभाची सावली त्याच्या उजवीकडे बरोबर 90 अंश पडलेली दिसली तर त्याचे तोंड कोणत्या दिशेस होते ?

(A) पूर्व (B) पश्चिम

(C) दक्षिण (D) उत्तर

73. 8, 5, 7, 2, 3 अंकापासून तयार होणारी सर्वात मोठी संख्या कोणती ?

(A) 85623 (B) 78235

(C) 53872 (D) 87532

74. 'ती पहा समोर बस आली' या वाक्याचा काळ ओळखा.

(A) अपूर्ण भूतकाळ

(B) साधा भूतकाळ

(C) पूर्ण वर्तमानकाळ

(D) अपूर्ण वर्तमानकाळ

75. जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना ________ म्हणतात.

(A) शब्दयोगी (B) उभयान्वयी

(C) केवलप्रयोगी (D) सर्वनामे

76. "देशासाठी भगतसिंग यांनी प्राणार्पण केले" या वाक्यातील विभक्ती ओळखा.

(A) द्वितीया (B) चतुर्थी

(C) पंचमी (D) षष्ठी

77. BDF : NPR : : HJL : ?

(A) RTV (B) STV

(C) SUX (D) TVX

78. खालीलपैकी कोणती नदी बंगालच्या उपसागरास मिळत नाही ?

(A) गोदावरी (B) ब्रह्मपुत्रा

(C) गंगा (D) यमुना

79. जगातील सर्वात लांब नदी कोणती आहे ?

(A) ॲमेझॉन (B) नाईल

(C) मिसिसीपी (D) सिंधू

80. 1 ते 100 मध्ये एकूण मूळ संख्या किती आहेत ?

(A) 25 (B) 15

(C) 35 (D) 30

81. मीठाचे रेणूसूत्र काय आहे ?

(A) NaCl (B) HCl

(C) $H_2O$ (D) KCl

82. दहशतवादाविरुद्ध विशेष कृती पथक म्हणून महाराष्ट्रात कोणते सशस्त्र दल काम करते ?

(A) एस.आर.पी.एफ.

(B) एस.एस.बी.

(C) डेल्टा फोर्स

(D) फोर्स वन

83. राज्यपालाचे पद रिकामे झाल्यास कोण तात्पुरते पद सांभाळतो ?

(A) विधानसभा अध्यक्ष

(B) उपराज्यपाल

(C) मुख्य न्यायाधीश

(D) उपसभापती

84. 'गितांजली' या प्रसिद्ध काव्यसंग्रहाचे लेखक कोण ?

(A) कुसुमाग्रज (B) रविंद्रनाथ टागोर

(C) बंकिमचंद्र चटर्जी (D) सुरेश भट

85. एका महिन्यात दिनांक 3 रोजी बुधवार होता, तर त्या महिन्यात 22 तारखेनंतर तिसऱ्या दिवशी कोणता वार आला असेल ?

(A) सोमवार (B) मंगळवार

(C) शुक्रवार (D) गुरुवार

86. $64 \div 0.08 = ?$

(A) 0.8 (B) 80

(C) 8000 (D) 800

87. $432 - ? = 47$

(A) 479 (B) 358

(C) 327 (D) 385

88. दक्षिणेतील विजयनगर राज्याची राजधानी कोणती होती ?

(A) बैंगलोर (B) मैसुर

(C) हम्पी (D) बिजापुर

89. 'तो नेहमी लवकर झोपतो' या वाक्यातील काळ ओळखा.

(A) साधा वर्तमानकाळ

(B) चालु वर्तमानकाळ

(C) पूर्ण वर्तमानकाळ

(D) रीति वर्तमानकाळ

90. कांगारू हा प्राणी कोणत्या देशात आढळतो ?

(A) भारत (B) रशिया

(C) बांग्लादेश (D) ऑस्ट्रेलिया

91. ओरिसा : भुवनेश्वर : : मणिपूर : ?

(A) आगरताळा (B) इम्फाळ

(C) गुवाहाटी (D) गंगटोक

92. जर P म्हणजे +, T म्हणजे −, R म्हणजे × तर 10 P 5 T 5 R 2 = ?

(A) 5 (B) 10

(C) −5 (D) 20

93. 'तेजोनिधी' हा जोडशब्द कोणत्या संधीचे उदाहरण आहे ?

(A) स्वरसंधी (B) व्यंजनसंधी

(C) विसर्गसंधी (D) पूर्वरूपसंधी

94. राष्ट्रपतींचा कार्यकाल ________ वर्षाचा असतो.

(A) दोन (B) तीन

(C) पाच (D) सहा

95. महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा कोणता आहे ?

(A) पुणे (B) नाशिक

(C) धुळे (D) अहमदनगर

96. जर राम श्यामपेक्षा 2 वर्षांनी मोठा असेल पण गितापेक्षा 1 वर्षांनी छोटा असेल. गिता सितापेक्षा 1 वर्षांनी लहान असेल व सिताचे वय 10 वर्ष असेल तर रामचे वय किती ?

(A) 6 (B) 8

(C) 9 (D) 7

97. खालीलपैकी कोणता किल्ला शिवाजी महाराजांनी बांधला आहे ?

(A) शिवनेरी (B) जंजीरा

(C) सिंधुदूर्ग (D) पन्हाळा

98. $300\frac{2}{3}$ व $200\frac{5}{2}$ यातील फरक किती ?

(A) $90\frac{1}{4}$ (B) $89\frac{1}{7}$

(C) $98\frac{1}{6}$ (D) $99\frac{1}{6}$

99. केंद्रीय अर्थमंत्री कोण आहेत ?

(A) नरेंद्र मोदी

(B) निर्मला सीतारमण

(C) अरूण जेटली

(D) राजनाथ सिंग

100. एका शेतात काही गायी व काही गुराखी आहेत. गायी आणि गुराखी यांच्या पायांची एकूण संख्या 98 आहे व डोक्यांची संख्या 26 आहे तर त्या ठिकाणी गायी व गुराखी किती आहेत ?

(A) 24, 2 (B) 6, 20

(C) 23, 3 (D) 3, 23

-oOo-

CamScanner 10-26-2021 13.55.05.pdf